Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २९ ] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १६-२२, २०२१/भाद्रपद २५-३१, शके १९४३ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२६.

### संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

### आदेश

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो. खामगांव (सु.)-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-३८६६.—

ज्याअर्थी, खामगांव नगर परिषदेच्या मूळ हद्दीची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक वि. यो. खामगांव(सु.) टिपीव्ही-६-२५६२, दिनांक ३० एप्रिल, १९९२ (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिलेले आहे) अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक १ नोव्हेंबर, १९९३ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिलेले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौजा सुटाळा खुर्द येथील स.नं. २९ व ३४ या जमिनींमधील अंदाजे १.७० हे. क्षेत्र आ. क्र. १०० "प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान" (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिलेले आहे.) यासाठी आरक्षित असून, सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, खामगांव आहे (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जागेचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, मौजा सुटाळा खुर्द येथील स. नं. ३४/१ या जमिनीचे संबंधित जमीन मालकांच्या वतीने ॲड जी. के. मुंधडा यांनी उक्त आरक्षणाने बाधित ०.४७ हे. क्षेत्राबाबात (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिलेले आहे.) उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक ०९-०७-२०१५ रोजी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वये सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिलेले आहे.) बजावलेली असून ती उक्त समुचित प्राधिकरणास दिनांक १३-०७-२०१५ रोजी प्राप्त झाली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वये उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) मधील तरतुदींनुसार विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त आरक्षणाखालील उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधाने कोणतीही पावले उचललेली नाहीत ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, खामगांव यांनी उक्त आरक्षणाच्या भूसंपादनाबाबत उक्त उधिनियमाचे कलम १२६ (४) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली नसल्याचे आणि मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्रमांक ८६०/२०१७ मध्ये दिनांक २८-०२-२०१८ रोजी उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबात आदेश दिले असल्याचे दिनांक ०२-०७-२०२१ रोजीचे पत्र क्रमांक ६००/ २०२१ अन्वये कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी त्यांचेकडील पत्र क्र. ९३३ दिनांक ०३-०८-२०२१ अन्वये उक्त जमीन मालकांची उक्त जमीन उक्त आरक्षणने बाधित होत असून मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) नुसार आदेश निर्गमित करणे आवश्यक असल्याचा अहवाल सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये उक्त जमिनींवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १-१२-२०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगर परिषद, मौजे, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व वि. यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त सूचनेखालील उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून भागशः व्यपगतझालेल्या भागाचे अंदाजे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | खामगांव नगर परिषद, मौजा सुटाळा खुर्द, ता. खामगांव, जि. बुलडाणा. | आ. क्र. १०० "प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान" (१.७० हे. आर) | स. नं. ३४/१ | ० ४७ |

**टीप :–** (१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणा-या विका- साच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकाना उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, खामगांव नगर परिषद, खामगांव, जि. बुलडाणा यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुधाकर नांगनुरे,**
संचालक,
नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ३१ ऑगस्ट २०२१.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२७.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P.-D.P. Khamgaon(R)-Sec-127(*2*)-Order-TPV-6-3866.—

Whereas, the Revised Development Plan of Original limit of Khamgaon Municipal Council has been sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. D.P. Khamgaon(R)-TPV-6-2562, dated 30th April 1992 (hereinafter referred to as "the said Notification") and the same has came into the force with effect from 01-11-1993 (hereinafter referred to as "the said sanctioned Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Development Plan, the land bearing S. No. 29 & 34 of Mouza Sutala Khurd is reserved for Reservation No. 100 "Primary School, Secondary School & Play Ground" admeasuring an area approximately 1.70 Ha. (hereinafter referred to as "the said Reservation") for which Appropriate Authority is Municipal Council, Khamgaon (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land under said reservations have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said sanctioned Development Plan came into force;

And whereas, on behalf of the concerned land owners of S. No. 34/1 at Mou. Sutala Khurd, Adv. G. K. Mundhada had served a notice in respect of 0.47 Ha. area affected by the said Reservation (hereinafter referred to as "the said Land") under Section 127 *(1)* of the said Act (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority on 9-07-2015, which was received by the said Appropriate Authority on 13-07-2015 ;

And whereas, the said land under the said reservation is not acquired or no steps for acquisition of the said land as required under Section 127 *(1)* of the said Act has been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period from the date of service of the said notice under Section 127 *(1)* of said Act ;

And whereas, the Chief Officer, Khamgaon Municipal Council *vide* letter No. 600/2021, dated 02-07-2021 has communicated that, the notification under Section 126 *(4)* has not been published & the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench on 28-02-2018 in Writ Petition No. 860/2017 has declared that the said Reservation on the said land is lapsed;

And whereas, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati *vide* its letter No. 933,dated 03-08-2021 has submitted report stating that, the said land is affected by the said Reservation and as per the order mentioned above of the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench, it is necessary to issue order under Section 127 (*2*) of the said Act ;

And whereas, after considering the above facts in respect of the said reservation on the said land in the said sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is on the opinion that, it is necessary to issue the order under Section 127 (*2)* of the said Act, regarding the lapsing of the said reservation partly on the said land ;

And whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1-12-2016 has delegated the powers exercisable by it to take action under Section 127 (2) of the said Act , to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans undertaken by all Municipal Councils /*Nagar Panchayats /* Zilla Parishad as a Planning Authority.

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as mentioned in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said reservation partly in respect of the said land under Section 127*(2)* of the said Act and for that purpose amends the said Notification of the said sanctioned Development Plan, as follows .

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added.—

SCHEDULE

| Sr. No. | Muncipal Council, Mauja, Taluka and District | Reservation of said sanctioned Development Plan & its Approximate Area as per D.P. Report | Description of the said land under the said Notice | Approximate Area lapsed from the part of said Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | | | (H.A.) |
| 1 | Khamgaon, Municipal Council, Mouza Sutala Khurd , Taluka Khamgaon, Dist. Buldana. | Reservation No. 100 "Primary School, Secondary School & Play Ground" (1.70 Ha.) | S.No.34/1 | 0 47 |

*Note :* (1) The said land so released from the said reservation shall become available to the said land owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

(2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Khamgaon during office hours on all working days for inspection to public upto one month.

(3) This order shall also be published on the Directorate's official web site *www.dtp.maharashtra.gov.in.*

SUDHAKAR NANGNURE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 31st August 2021.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२८.

## संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

### आदेश

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो. वरुड (सु. + वा.) कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-३८६७.—

ज्याअर्थी, वरुड नगर परिषदेची विकास योजना [ (मूळ (सुधारित) + वाढीव)] महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेला आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-२८०३-१८९६- प्र. क्र. ८(A) -२००४-नवि-३०, दिनांक १५ जुलै २००५ (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिलेली आहे) अन्वये भागशः मंजूर केली असून ती दिनांक १-०९-२००५ पासून अंमलात आलेली आहे तर वगळलेल्या भागाची पुर्नप्रसिद्धी विकास योजना अधिसूचना क्रमांक टिपीएस-२८०६-३७९- प्र. क्र. २४३-२००६-नवि-३०, दिनांक ०६-०६-२००७ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दिनांक १६-०७-२००७ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिलेली आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौजा वरुड येथील स. नं. ३९० (भाग), ३९३ (भाग) व ३९७ (भाग), या जमिनी आ. क्र. १२, "वाहनतळ" (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिलेले आहे.) यासाठी आरक्षित असून, सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, वरुड आहे (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरण यांनी उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जागेचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा वरुड येथील स. नं. ३९३ (भाग) या जमिनीचे (यापुढे "उक्त जमीन" संबोधिलेले आहे.) संबंधित जमीन मालकांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिलेले आहे.) उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वये उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक १८-१२-२०१७ रोजी बजावलेली सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिलेले आहे.) उक्त समुचित प्रधिकरणास दिनांक ११-०६-२०१८ रोजी प्राप्त झाली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालक यांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) मधील तरतुदींनुसार विहीत मुदतीत उक्त जमीन संपादित केली नाही अथवा उक्त आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधाने कोणतीही पावले उचलेली नाहीत ;

आणि ज्याअर्थी, वरुड नगर परिषदेचे सर्वसाधारण सभेने दिनांक ३०-१२-२०१८ रोजीचे ठराव क्र. ११३ अन्वये उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण वगळणेबाबतचे प्रस्तावास मंजुरी प्रदान केली आहे व त्यानुषंगाने मुख्याधिकारी, वरुड नगर परिषद यांनी उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत करणेस हरकत नसल्याचे दिनांक १०-०९-२०२० रोजीचे पत्र क्र. १९०७ अन्वये कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडील पत्र क्रमांक ९६०, दि. ०४-०८-२०२१ अन्वयेच्या सुधारित अहवालानुसार उक्त जमिनीचे ०.४७ हे. आर क्षेत्र उक्त आरक्षणाने बाधित होत असल्याचे स्पष्ट होत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १-१२-२०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.—

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगर परिषद मौजे, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण व वि. यो. अहवालानुसार अंदाज क्षेत्र | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून भागशः व्यपगत झालेल्या अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | हे. आर | | हे. आर |
| १ | वरुड नगर परिषद, मौजा वरुड, ता. वरुड, जि. अमरावती. | आ. क्र. १२ "वाहनतळ" (१.००१४ हे. आर) | स. नं. ३९३ (भाग) | ० ४७ |

**टीप :–** (१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी,वरुड नगर परिषद, वरुड, जि. अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुधाकर नांगनुरे,**
संचालक,
नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ३१ ऑगस्ट २०२१.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२९.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P.-D.P. Warud(R+A)-Sec-127(*2*)-Order-TPV-VI-3867.—

Whereas, the Development Plan of Warud Municipal Council [Revised + Additional] has been partly sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as “the said Act”) by the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-2803-1896-CR-8(A)-2004-UD-30, dated 15-07 2005 (hereinafter referred to as “the said Notification”) and came into force with effect from 01-09-2005, while Republished Development Plan of Excluded Part of Warud has been sanctioned *vide* Notification No. TPS-2806-379-CR-243-2006-UD-30, dated 06-06-2007 and came ino force with effect from 16-07-2007 (hereinafter referred to as “the said Sanctioned Development Plan”);

And whereas, in the said Sanctioned Development Plan, the lands bearing S. No. 390 (Part), S. No. 393 (Part), & S. No. 397 (Part),of Mouza Warud is reserved for Site No. 12 “Parking” (hereinafter referred to as “the said Reservation”) for which Appropriate Authority is Municipal Council, Warud (hereinafter referred to as “the said Appropriate Authority”);

And whereas, the land under said reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Revised Development Plan came into force;

And whereas, the concern Land Owners (hereinafter referred to as “the said Land Owner”) of the land bearing S. No. 393 (Part) Mouza Warud (hereinafter referred to as “the said Land”) under the said reservation had served a notice, dated 18-12-2017 under Section 127 *(1)* of the said Act, (hereinafter referred to as “the said Notice”) on the said Appropriate Authority which was received on dated 11-06-2018 ;

And whereas, the said land is not acquired or no steps as required under Section 127*(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period from the date of service of the said notice ;

And whereas,the General Body Meeting Warud Municipal Council has given approval for the proposal of deletion of reservation on the said land *vide* Resolution No. 113, dated 30-12-2018 and accordingly the Chief Officer, Municipal Council, Warud *vide* letter No 1907, dated 10-09-2020 has communicated its no objection for lapsing of the said Reservation ;

And whereas, as per the revised report of the Joint Directior of Town Planning, Amravati Division, Amravati *vide* letter No. 960, dated 04-08-2021, it is clarified that area admeasuring 0.47 Ha.of the said land is affected by the said Reservation ;

And whereas, after considering the above facts in respect of the said reservation of the said land in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under Section 127 (*2)* of the said Act, regarding the lapsing of the said reservation partly of the said land ;

And whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1-12-2016 has delegated the powers exercisable by it under Section 127 *(2)* of the said Act , in respect of Development Plans of all Municipal Councils /*Nagar Panchayat* and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said reservation partly in respect of the said land under Section 127*(2)* of the said Act and for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows ;

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added.—

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council Mauja, Taluka and District | Reservation in the said Sanctioned Development Plan & its Approximate Area as per D.P. Report | Description of the said Land | Approximate Area Partly lapsed from the said Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | H.A. | | H.A. |
| 1 | Warud Municipal Council, Mouza Warud, Taluka Warud, Dist.Amravati. | Site No.12 "Parking" (1.0032 Hect.) | S.No.393 (Part) | 0 47 |

*Note :* (1) The said land so released from the said reservtion shall become available to the said land owner for the purpose of development as othrwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

(2) A copy of the part plan of the said Sanctioned Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Warud district Amravati during office hours on all working days for inspection to public up to one month.

(3) This Order shall also be published on the Directorate's official web site *www.dtp.maharashtra.gov.in.*

SUDHAKAR NANGNURE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 31st August 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.